**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०००३२
**दुरध्वनी क्र.** ०२२-२२०२५६०९ **Email ID :** tca-mh@nic.in

तात्काळ/महत्वाचे दि. ०८.०८.२०२३.

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, गृह विभाग
२) अपर मुख्य सचिव (वने) , वन विभाग
३) प्रधान सचिव, गृह विभाग ( परिवहन )
४) प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग
५) प्रधान सचिव, नगरविकास विभाग (२)
६) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग
७) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
८) प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग
९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१०) विभागीय आयुक्त, कोकण/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
११) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे,
१२) आयुक्त, सर्व महानगरपालिका,
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
१४) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई.

**विषय :-** "मेरी माटी मेरा देश" अर्थात "मेरी माती मेरा देश" अभियान.

**संदर्भ :-** श्री गोविंद मोहन, सचिव, संस्कृति मंत्रालय व श्रीमती मिता लोचन, सचिव, युवक कार्यक्रम विभाग, भारत सरकार यांचे संयुक्त अ.शा.प.क्र.४२-२२/२६१/२०१३-AKAM, दि.७.०८.२०२३ .

महोदय,

"मेरी माटी मेरा देश" अर्थात "माझी माती माझा देश" या अभियानाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने यापुर्वी केंद्र शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सुचना आपणास अवगत करण्यात आलेल्या आहेत. या अभियानाच्या अनुषंगाने देशातील विविध घटकांकडून प्राप्त झालेल्या सूचनांचा विचार करुन केंद्र शासनाने आता संदर्भाधीन पत्रान्वये पूर्वीच्या सूचनेत अंशत: बदल केले आहेत. ते खालील प्रमाणे आहेत:-

(१) यापूर्वी केंद्र शासनाने अमृत सरोवर अथवा जलस्त्रोतांच्या शेजारी शिलाफलक उभारण्याच्या सूचना दिल्या असल्या तरी अशा शिलाफलकांची उभारणी शालेय प्रांगणात करण्यात यावी, जेणेकरुन शाळेतील दैनंदीन प्रार्थनेनंतर शहीदांच्या शौर्याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये चर्चा होऊ शकेल आणि या शहीदांचे हौतात्म्य दिनही सन्मानपूर्वक साजरे केले जाऊ शकतील.

Scanned with CamScanner

(२) अमृत कलश यात्रेस व्यापक जनप्रतिसाद व यश लाभावे या दृष्टीने या यात्रेचा कालावधी दीर्घ असेल असे नियोजन करणे आवश्यक आहे. या बाबतच्या मार्गदर्शक सूचना व कालमर्यादा स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. त्या प्राप्त झाल्यानंतरच त्यानुरुप कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे.

(३) पंचप्रण शपथेकरीताच्या केंद्र शासनाच्या सुधारीत मसुद्याचे मराठीतील भाषांतर सोबत जोडण्यात आले आहे. त्याचा वापर शपथ सोहोळयात करण्यात यावा.

(४) शिलाफलकावर कोरावयाच्या मा.प्रधानमंत्री यांच्या संदेशाचे मराठी भाषांतर सोबत जोडण्यात आले आहे.

या संदर्भातील पूर्वी देण्यात आलेल्या सूचनांमध्ये केंद्र शासनाकडून कळविण्यात आलेले बदल तात्काळ सर्व संबधितांच्या निर्दशनास आणण्यात यावेत व या सुधारीत सूचनांप्रमाणेच कार्यवाही होईल, याची खातरजमा करावी, ही विनंती.

आपला,

(विलास थोरात)
उप सचिव (सांस्कृतिक कार्य)

सहपत्र:- वरील प्रमाणे.

प्रत:-

१) मा. मंत्री (सां.का.) यांचे कार्यालय, मुंबई
२) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक.

Scanned with CamScanner

# पंचप्रण शपथेचा नमूना

आम्ही शपथ घेतो की :-

- भारतास २०४७ पर्यंत आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न साकार करु.
- गुलामीची मानसिकता मूळापासून नष्ट करु.
- देशाच्या समृध्द वारशाचा गौरव करु.
- भारताची एकात्मता बलशाली करु आणि देशाचे संरक्षण करणाऱ्यांप्रती सन्मान बाळगू.
- देशाचे नागरीक म्हणून सर्व कर्तव्यांचे पालन करु.

**

Scanned with CamScanner

# Design with names

**ग्राम पंचायत / नागरी  भागात उभे करावयाचे शिलाफलक- ज्या गावात स्वातंत्र्यसैनिक व हुतात्मे यांचे नावे उपलब्ध आहेत तेथे शिलाफलक**






Scanned with CamScanner

# Design without names

**ग्राम पंचायत / नागरी भागात उभे करावयाचे शिलाफलक- ज्या गावात स्वातंत्र्यसैनिक व हुतात्मे यांचे नावे उपलब्ध नाहीत तेथे शिलाफलक**






Scanned with CamScanner